# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :—www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.**


पत्र क्र.रासेयो/२६१/२०१८—१९
दिनांक : १० ऑगस्ट, २०१८

प्रति,
प्राचार्य,
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये,

विषय : रस्ता सुरक्षेचे दृष्टीकोनातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा समुपदेशन व महाविद्यालयात शिकावू वाहनचालक अनुज्ञप्ती (लायसन्स) देण्याची योजना कार्यान्वीत करण्याबाबत.

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात परिवहन आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचे पत्र मा. कुलगुरु यांचेकडून राष्ट्रीय सेवा योजना विभागास पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झाले आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी महाविद्यालयात ये—जा करताना व इतर वेळी बहुशः दुचाकी वाहनांचा मोठया प्रमाणावर वापर करीत असतात. अशा विद्यार्थ्यांना बहुदा सुरक्षित वाहन चालविण्याची मुळ तत्वे, नियम, वाहतुक चिन्हे याबाबत अपूर्ण माहिती असते व काही विद्यार्थ्यांकडे नियमानुसार वाहनचालक अनुज्ञप्ती (लायसन्स) ही नसते. अशा विद्यार्थ्यांमुळे रस्तासुरक्षा व त्यांची वैयक्तीक सुरक्षा धोक्यात येऊ शकते.

विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित वाहन चाविण्याविषयी जागरुकता निर्माण व्हावी व त्यासोबत महाविद्यालयातील इच्छुक विद्यार्थ्यांना वाहन चालक शिकावू अनुज्ञप्ती (लायसन्स) प्राप्त व्हावी या उद्देशाने परिवहन विभागाने योजना तयार केली असून त्या संदर्भात परिवहन विभागाचे स्थानिक अधिकारी आपल्या महाविद्यालयात संपर्क साधून महाविद्यालयाचे प्राचार्य व कर्मचारी यांच्या मदतीने सदर कार्यक्रम राबवतील. या योजनेचा तपशील सोबत जोडला आहे.

कृपया आपल्या महाविद्यालयात स्थानिक परिवहन विभागाकडून वरील उपक्रम राबविण्यासाठी येणा—या कर्मचारी/अधिकारी यांना सहकार्य करावे व रस्ता सुरक्षा वृध्दीगत करण्यासाठी सहकार्य करावे, हि विनंती.

आपला विश्वासू

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग

सोबत: वरीलप्रमाणे.